अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय देखील पारित केलेला आहे. अपिलार्थी यांनी यापूर्वी देखील मोठ्या प्रमाणावर माहितीचे अर्ज कार्यालयाकडे सादर केलेले आहेत. मात्र अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध माहितीच्या अवलोकनबाबत कळविले तर अपिलार्थी माहितीच्या अवलोकनास उपस्थित राहत नाही, काही प्रकरणामध्ये माहितीचा शुल्काचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे बाबत कळविले असता, अपिलार्थी शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेत नाही. अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली तर चुकीची, दिशाभुल करणारी व अपूर्ण माहिती दिली असे नमुद करुन प्रथम अपील दाखल करतात. अपिलार्थी हे माहिती अधिकारात सतत माहितीचे अर्ज देऊन प्रशासनावर दबाब करण्याच्या उद्देशानेच वेगवेगळ्या माहितीची मागणी करतात. अपिलार्थी यांच्या सतत माहिती अर्ज करण्याच्या कृतीचा विपरीत परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावर होऊन गरजु व्यक्तीस न्याय देता येणे शक्य होत नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिलेला असल्यामुळे विचाराधीन द्वितीय अपीले निकाली काढण्यात यावीत, अशी विनंती आहे.

3. अपिलार्थी यांनी अनेक प्राधिकरणाकडे / कार्यालयाकडे माहिती अर्ज सादर केलेले आहेत. सार्वजनिक प्राधिकरण हे आपले दैनंदिन कामकाम सांभाळून माहिती अधिकारात माहिती देण्याचे काम करतात. माहिती अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 6 (1) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर या अर्जावर 30 दिवसाच्या मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र एकाच प्राधिकरणाकडे एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यानंतर या सर्व अर्जावर 30 दिवसाच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांना कार्यवाही करणे शक्य होत नाही. आणि याचा विपरित परिणाम कार्यालयीन दैनंदिन कामकाजावर होतो. अशा मोठया प्रमाणावर अर्ज करणाऱ्या व्यक्तीमुळे गरजवंत अर्जदारावर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या प्रभावी अंमजबजावणीस गतीरोध निर्माण होतो, असे आयोगाचे मत आहे.

4. माहिती कायद्यामध्ये माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी माहितीचा मूळ उद्देश हा आहे की, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रगटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना जसे शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालविणे व मर्यादित साधनसामग्रीचा इष्टतम वापर होणे इ. बाबीस बाधा येणार नाही या बाबी देखील पाहणे आवश्यक आहेत. अपिलार्थी वारंवार निरनिराळ्या प्राधिकरणाकडे मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज करुन शासकीय यंत्रणेस वेठीस धरत असतील, असे अपिलार्थी यांनी मोठ्या प्रमाणावर केलेल्या माहिती अर्जांवरुन म्हणण्यास पुरसा वाव आहे. मात्र अपिलार्थी यांच्या अशा कृतीमुळे प्राधिकरणातील शासकीय कामात अडथळा अथवा गतिरोध निर्माण होऊन त्याचा विपरित परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावर होतो व माहिती अर्जातील विस्तृत, व्यापक, विश्लेषणात्मक, संनिग्ध माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेच्या वेळेचाही अपव्यय होतो.

5. तसेच अशा प्रकरणासंबंधात मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील 6454/2011, दिनांक 09.08.2011 रोजी या प्रकरणी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where 75 % of the staff of public authorities spend 75 % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

एकाच व्यक्तीने मोठया प्रमाणावर केलेल्या माहिती अर्जामुळे शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला/नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडून प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

6. तसेच अपिलार्थी यांचा माहिती अर्ज पाहता, त्यांनी विस्तृत व मोघम स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. याबाबत मा.उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.20182, दिनांक 27.01.2009 मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being any useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

7. यावरुन माहिती अधिकार कायद्यातंर्गत पुन्हा पुन्हा माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी, अपिलाशी संबंधित कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ इतर शासकीय कामकाज करण्यासाठी देणे शक्य होत नाही. तसेच पुन्हा तोच विषय व्दितीय अपिलापर्यंत आल्यास माहिती आयोगाला क्रमवारीनुसार प्राप्त झालेल्या इतर व्दितीय अपिलांच्या सुनावणीसाठी वेळ देणे शक्य होत नाही.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी वरील पारित केलेले निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे. या पार्श्वभुमिवर आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

अपिलार्थी यांची सर्व 99 द्वितीय अपिले फेटाळण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 19111 दि. 18/10/2024

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४५७३ ते ४५८८/२०२३ (१६)**

श्री.बालाजी दशरथ देशमुख,
रा.गुगळ पिंपरी, पो.माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, आजेगाव, ता.सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली — उत्तरवादी क्र.२

**(ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१२.०७.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये १६ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या १६ माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १०० | २७.०४.२०२३ | सन ०१.०१.२०१० ते आजपर्यंत, रोजगार हमी योजनेतंर्गत राबविलेल्या योजनाबाबत, |
| १०१ | २७.०४.२०२३ | ग्रामपंचायतीने सन २०११ ते आजपर्यंत कोणकोणती विकास कामे केली, विकास कामाची यादी द्यावी व त्या विकास कामासाठी केंद्र सरकार / राज्य सरकार च्या योजनेतुन किती निधी मिळाला, सदर निधी कामे व कसा खर्च करण्यात आला याची सर्व साक्षांकित प्रतीत, |
| १०२ | २७.०४.२०२३ | आपल्या ग्रा.प कार्यालयात व ग्रामसभेच्या सर्व ठरावाच्या साक्षांकित प्रती देणे, ग्रामपंचायतच्या मागील ३ वर्षाच्या ऑडिट रिपोर्टच्या साक्षांकित प्रती, |
| १०३ | २७.०४.२०२३ | म.ग्रा.रोजगार हमी योजने अंतर्गत सन ०१.०१.२०११ ते आजपर्यंत केलेल्या सर्व कामाची यादी दणे, सर्व कार्यारंभ आदेश, वर्कऑर्डर, इस्टीमेट, एम.बी., कम्प्लीशनच्या सर्व साक्षांकित प्रती, |
| १०४ | २७.०४.२०२३ | आपल्या ग्रा.प.ला जनसुविधा विशेष अनुदान किती प्राप्त झाले व कोणत्या कामाचा किती खर्च झाले याचा सर्व तपशिल देणे, नागरी सुविधासाठी विशेष अनुदान किती प्राप्त झाले व किती खर्च झाले, |
| १०५ | २७.०४.२०२३ | आपल्या ग्रा.प.ला खासदार, आमदार, जि.प. सदस्य तसेच इतर लोकप्रतिनिधी कडुन विविध विकास कामे करण्यासाठी मिळालेल्या सर्व निधी / अनुदान याची संपूर्ण माहिती, साक्षांकित प्रती देणे, त्या सर्व कामाची वर्कऑर्डर, इस्टीमेट, बँक स्टेटमेट, ठेकेदारानी काम केले असल्यास ठेकेदाराचे नाव, कन्स्ट्रक्शनचे नाव, प्राप्त निधी जमा निधी खर्च निधी याची संपूर्ण |

| | | |
|---|---|---|
| | | माहिती, |
| १०६ | २७.०४.२०२३ | आपल्या ग्रा.पं. कार्यालयाकडुन वार्षिक नियोजन व बजेटसाठी नियोजन विभागने पत्र क्र.४९ मग्रारोहयो-२०११ प्र.क्र.४९/रोहयो १४ मंत्रालय मुंबई दि.०१ आक्टोबर २०११ अन्वये, वार्षिक नियोजन सन २०१९ ते आजपर्यंत, ०२ आक्टोबर रोजी कामाची निवड यादी देणे, ३ ते ५ आक्टोबर ग्रामसभेमध्ये मंजुरी घेतलेली यादी देणे, १६ ते ३० नोव्हेंबर तालुका स्तरावर मंजुरी होऊन जिल्हाधिकारी यांना सादर केलेल्या सर्व कामाच्या साक्षांकित प्रती, |
| १०७ | २७.०४.२०२३ | आपल्या ग्रा.पं. कार्यालयाकडुन करण्यात आलेल्या सर्व विकास कामाची ग्रामसभेने मंजुरी दिलेल्या ठरावाच्या साक्षांकित प्रती व शासन निर्णयासोबतचे प्रपत्र अ साक्षांकित प्रती देणे, विकास कामाचे शाखा अभियंता पंचायत समिती यांनी तपासणी करुन प्रमाणित केलेल्या सर्व अंदाजपत्रकाच्या साक्षांकित प्रती, |
| १०८ | २७.०४.२०२३ | आपल्या ग्रा.पं. कार्यालयास नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान योजने अंतर्गत किती निधी / अनुदान प्राप्त झाले त्या निधीचा वापर बाजारपेठ विकास, सार्वजनिक दिवाबत्तीची सोय, बागबगीचे उद्याने तयार करणे, अभ्यास केंद्र, गाव अंतर्गत रस्ते करणे, सांडपाणी व्यवस्थापनासाठी नाल्याचे बांधकाम करणेसाठी किती निधी प्राप्त झाला व किती खर्च झाला, त्या कामाचे आराखडे, ग्रामसभेची प्रशासकीय मान्यता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांची प्रस्तावाची मान्यता, अंदाजपत्रक व आराखडे नकाशेच्या सर्व साक्षांकित प्रती, |
| १०९ | २७.०४.२०२३ | तांत्रिक मान्यता, १. पं. समितीच्या कनिष्ठ अभियंता यांनी दिलेल्या मान्यता किती, २. पं. समितीच्या शाखा अभियंता यांनी दिलेल्या मान्यता किती, ३. उपअभियंता यांनी दिलेल्या मान्यता किती, ४. कार्यकारी अभियंता जि.प. हिंगोली यांनी दिलेल्या मान्यता, ५. अधीक्षक अभियंता यांनी दिलेल्या सर्व प्रशासकीय मान्यताच्या साक्षांकित प्रती, |
| ११० | २७.०४.२०२३ | आपल्या ग्रा.पं. आजेगाव कडून ग्रामपंचायत साहित्य खरेदी केलेल्या सर्व साहित्याच्या प्रती देणे, दरपत्रक मागणी नोटीस जाहिरात प्रत देणे, सर्व बिलाच्या साक्षांकित प्रती देणे, कॅश बुक न.नं.५, न.नं.१८, न.नं.६, ८, ९, ११, १५, १९ व अॅडव्हान्स डिपॉझिट रजिस्टर न.नं.२० च्या सर्व साक्षांकित प्रती देणे, |
| १११ | २७.०४.२०२३ | ग्रामपंचायत नमुना नं.३ जमा खर्चाचे विवरण देणे, नमुना नं.५ सामान्य रोकड वही सर्व नोंदी देणे, नमुना नं.६ मासिक जमा खर्चाची नोंद देणे, नमुना नं.७, सामान्य पावती सर्व साक्षांकित प्रती देणे, नमुना नं.८ कर आकारणी नोंदवही सर्व साक्षांकित प्रती देणे, नमुना नं.१३ सर्व नोंदी देणे, नमुना नं.१५, १६, १७, १८ ते ३३ पर्यंत सर्व ग्रामपंचायतीने केलेल्या व्यवहाराच्या साक्षांकित प्रती देणे, |
| ११२ | २७.०४.२०२३ | आपल्या ग्रा.पं.आजेगाव यांचे सर्व खाते क्र. चेक बँक स्टेटमेंट व किर्द बुकाच्या साक्षांकित प्रती देणे, ग्रा.पं. अंतर्गत सर्व बाबींसाठी वापरण्यात आलेल्या निधीच्या सर्व खाते बु सर्व माहिती साक्षांकित प्रतीत देणे, |
| ११३ | २७.०४.२०२३ | ग्रामपंचायत कार्यालय आजेगाव आपल्या ग्रामपंचायतीने सन २०१९ ते आजपर्यंत प्रति वर्षी कोणकोणत्या उद्देशासाठी शासनाकडुन किती रुपये थेट अनुदान किती मदत मिळाली याची साक्षांकित प्रतीत माहिती देणे, |
| ११४ | ०८.०५.२०२३ | आपल्या ग्रा.प. कडुन म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत झालेल्या सर्व कामाची यादी देणे, तसेच लाभार्थी यादी देणे, तसेच मस्टरच्या साक्षांकित प्रती देणे, |
| ११५ | ०८.०५.२०२३ | ग्रामसभेचे प्रोसेडिंग सर्व प्रती, १४ वा वित्त आयोग व १५ वा वित्त आयोगाचे फंड रजिस्टरच्या छायांकित प्रती, व्हावचर छायांकित प्रती देणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी कार्यालयाकडे वारंवार माहिती अर्ज सादर करतात. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर कार्यालयाकडे माहिती अर्ज दाखल केलेले आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे विस्तृत, व्यापक, मोठ्या कालावधीची तसेच अनेक विषयाशी संबंधित माहितीची मागणी केलेली आहे. अपिलार्थी यांनी एका वेळी मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज सादर

केल्यामुळे त्याचा विपरित परिणाम कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर झालेला आहे. अशा परिस्थतीत देखील अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन हवी असलेली माहिती कार्यालयात उपस्थित राहुन प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थी यांना अवगत केलेले आहे. तथापि माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलार्थी कार्यालयात उपस्थित राहिले नसल्यामुळे माहिती अपिलार्थी यांना देता आलेली नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी कार्यालयात उपस्थित राहुन माहिती घेऊन जावी असे कळवितात. परंतु त्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहिल्यानंतर ते खोट्या केसेस करुन गुन्हा दाखल करतात. त्यामुळे माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहता आलेले नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनमध्ये, कोणतीही माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची असुन ती एका पेक्षा अधिक विषयाशी निगडित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे. तसेच अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केलेले आहे. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रं २०१६/प्र.क्र.(१७८/१६)सहा, दि.०१.०२.२०१७ मध्ये असे नमूद केलेले आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जास्त पृष्ठांची असल्यास त्यांना अवलोकन देऊन ५० पृष्ठांची माहिती विनामूल्य द्यावी व यापेक्षा जास्त माहिती हवी असल्यास त्यासाठी नियमित दराने आकारणी करण्यात यावी.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आजेगाव, ता.सेनगाव, जि.हिंगोली यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद सर्व जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली **एका विषयाची (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची) व एक वर्ष कालावधीची माहिती**, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. सदर अवलोकनाच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना नेमक्या कोणत्या एक वर्ष कालावधीची माहिती हवी आहे याबाबत जन माहिती अधिकारी यांना अवगत करावे. त्यानुसार अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ व महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (दुसरी सुधारणा) २०१२ नुसार माहितीचे अवलोकन अपिलार्थी यांना व्यक्तिशः अनुज्ञेय राहील व असे अवलोकन प्रतिनिधीस अनुज्ञेय असणार नाही.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह १६ व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र.व्दि.अ. ४५७३ ते ४५८८/२०२३/एस/- 19132 दिनांक :- 18/10/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्र. ६२७६ ते ६२८०/२०२३ (०५)**

सौ.गिताबाई दिलीप म्हस्के,
रा.सुभेदार रामजीनगर, मिसारवाडी, पो.नारेगाव,
ता.जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, मांडकी, ता.जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२८.०९.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये पाच द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत..

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या पाच माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| २९ | १९.०६.२०२३ | सदरील कालावधीत १४ वा वित्त आयोग अंतर्गत प्राप्त निधीच्या योजनेतंर्गत खरेदी केलेल्या वस्तुची यादी, साहित्य व इतर वस्तुची यादी, वस्तुचे नाव, संख्या, नग, वस्तुनिहाय रक्कम रुपये, तसेच इतर खर्चाच्या जीएसटीसह पावत्याची / बिलाच्या छायांकित प्रती, |
| ३० | १९.०६.२०२३ | ग्रामपंचायत अंतर्गत आस्थापनेवार कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी यांच्या सेवाकार्यकाळात जिल्हा परिषद, पंचायत समिती औरंगाबाद या कार्यालयातंर्गत घेण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत बोअरवेलची यादी, बोअरवेलचे स्थळ व ज्याचा गट क्रमांक, ग्रामपंचायत मिळकत क्रमांक, बोअर वेल घेण्याकरिता ग्रामपंचायतीने घेतलेला ठरावाची छायाप्रत, |
| ३१ | १९.०६.२०२३ | ग्रामपंचायत अंतर्गत आस्थापनेवार कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी यांच्या सेवाकार्यकाळात ग्रामपंचायत हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना अनुदानाची एकूण रक्कम रुपये, दिव्यांग व्यक्तींना अनुदानाची एकुण रक्कम रुपये, दिव्यांग व्यक्तीचे नाव, रक्कम रुपये, दिव्यांग प्रमाणपत्र, दिव्यांग व्यक्तीना अनुदान वाटप करणेबाबत घेण्यात आलेल्या ठरावाची छायांकित प्रत, |
| ३२ | १९.०६.२०२३ | ग्रामपंचायत अंतर्गत आस्थापनेवार कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी यांच्या सेवाकार्यकाळात वर्षनिहाय विविध योजनेतंर्गत राबविण्यात आलेल्या योजनांची यादी, योजनेचे नाव, योजनेनिहाय प्राप्त रक्कम रुपये, योजनानिहाय हेड क्रमांक, योजनानिहाय व हेडक्रमांकनिहाय बँक विवरण, , सन २०२०-२१ ते २०२२-२३, |

| | | |
|---|---|---|
| ३३ | १९.०६.२०२३ | ग्रामपंचायत अंतर्गत आस्थापनेवार कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी यांच्या सेवाकार्यकाळात ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच यांना वाटप करण्यात आलेल्या महिनानिहाय मानधनाची रक्कम, ग्रामपंचायत सदस्याचे नाव, सरपंच, उपसरपंच यांचे नाव, देण्यात आलेल्या मानधनाची रक्कम रुपये, सदर मानधन हे कोणत्या हेड अंतर्गत वाटप करण्यात आले, ते चेक अथवा रोखीन देण्यात आले याबाबतचे बँक विवरण, सदर ग्रामपंचायत सदस्यांनी मानधन घेते वेळेस केलेल्या स्वाक्षरी, सन २०२०-२१ ते २०२२-२३ |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांचे माहितीचे अर्ज कार्यालयास अप्राप्त असल्यामुळे सदर अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.०८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे माहितीचे अर्ज उपलब्ध करुन दिलेले आहेत. सदर माहिती अर्जामध्ये अपिलार्थी यांनी त्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच सदर माहिती अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची आहे. सदर मागणी केलेली माहिती संकलित / एकत्रित करुन अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली असुन अपिलार्थी यांनी तसे दि.०३.१०.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये त्यांनी, माहिती मिळाली असल्याचे व समाधान झाले असल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.०३.१०.२०२४ रोजीचे जन माहिती अधिकारी यांना उद्देशुन लिहिलेले लेखी निवेदन विचारात घेता, अपिलार्थी यांची विचाराधिन पाचही व्दितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांची उपरोक्त पाच व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ.६२७६ ते ६२८०/२०२३/एस/ 19127 दिनांक : 18/10/2024

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

व्दितीय अपील क्र. ६२८१ ते ६२८८/२०२३ (०८)

सौ.गिताबाई दिलीप म्हस्के,
रा.सुभेदार रामजीनगर, मिसारवाडी, पो.नारेगाव,
ता.जि.छत्रपती संभाजीनगर

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, लाडसावंगी, ता.जि.छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२८.०९.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये आठ व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद, सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या आठ माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ३४ | १९.०६.२०२३ | सन २०१९-२०, सदरील कालावधीत १४ वा वित्त आयोग अंतर्गत प्राप्त निधी व योजनेतंर्गत खरेदी केलेल्या वस्तुची यादी, साहित्य व इतर वस्तुची यादी, वस्तुचे नाव, संख्या, नग, वस्तुनिहाय रक्कम रुपये, तसेच इतर खर्चाच्या जीएसटीसह पावत्याची / बिलाच्या छायांकित प्रती, |
| ३५ | १९.०६.२०२३ | सन २०२०-२१ ते २०२२-२३, ग्रामपंचायत अंतर्गत सध्या आस्थापनेवर कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी यांच्या सेवाकार्यकाळात जिल्हा परिषद, पंचायत समिती औरंगाबाद या कार्यालयातंर्गत घेण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत बोअरवेलची यादी, बोअरवेलचे स्थळ व ज्याचा गटक्रमांक, ग्रामपंचायत मिळकत क्रमांक, बोअर वेल घेण्याकरिता ग्रामपंचायतीने घेतलेल्या ठरावाची छायाप्रत, |
| ३६ | १९.०६.२०२३ | सन २०१४-१५ ते २०२२-२३, ग्रामपंचायत अंतर्गत सध्या आस्थापनेवर कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी यांच्या सेवाकार्यकाळात ग्रामपंचायत हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना अनुदानाची एकुण रक्कम रुपये, दिव्यांग व्यक्तीचे नाव, रक्कम रुपये, दिव्यांग प्रमाणपत्र, दिव्यांग व्यक्तीना अनुदान वाटप करणे बाबत घेण्यात आलेल्या ठरावाची छायांकित प्रत, |

| | | |
|---|---|---|
| ३७ | १९.०६.२०२३ | ग्रामपंचायत अंतर्गत आस्थापनेवार कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी यांच्या सेवाकार्यकाळात वर्षनिहाय विविध योजनेतंर्गत राबविण्यात आलेल्या योजनांची यादी, योजनेचे नाव, योजनेनिहाय प्राप्त रक्कम रुपये, योजनानिहाय हेड क्रमांक, योजनानिहाय व हेडक्रमांकनिहाय बँक विवरण, , सन २०२०-२१ ते २०२२-२३, |
| ३८ | १९.०६.२०२३ | सन २०२१-२२ ते २०२२-२३, ग्रामपंचायत अंतर्गत आस्थापनेवार कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी यांच्या सेवाकार्यकाळात ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच यांना वाटप करण्यात आलेल्या महिनानिहाय मानधनाची रक्कम, ग्रामपंचायत सदस्याचे नाव, सरपंच, उपसरपंच यांचे नाव, देण्यात आलेल्या मानधनाची रक्कम रुपये, सदर मानधन हे कोणत्या हेड अंतर्गत वाटप करण्यात आले, ते चेक अथवा रोखीने देण्यात आले याबाबतचे बँक विवरण, सदर ग्रामपंचायत सदस्यांनी मानधन घेते वेळेस केलेल्या स्वाक्षरी |
| ३९ | १९.०६.२०२३ | ग्रामपंचायत अंतर्गत आस्थापनेवार कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी यांच्या सेवाकार्यकाळात वर्षनिहाय, महिनानिहाय घेण्यात आलेल्या ग्रामसभेच्या ठरावाची, मासिक सर्वसाधारण सभेच्या ठरावाची छायांकित प्रत, सन २०१९-२० ते २०२२-२३ |
| ४० | १९.०६.२०२३ | ग्रामपंचायत अंतर्गत आस्थापनेवार कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी यांच्या सेवाकार्यकाळात शिवारात गावठाण व गायरान जमिनीचा गट क्रमांक, क्षेत्र, सदर गावठाण, गायरान जमिनीवर करण्यात आलेल्या अतिक्रमण धारकांची यादी, शासनाच्या निर्णयानुसार किती अतिक्रमणधारकांना अतिक्रमण हटविण्याबाबत देण्यात आलेल्या नोटीसीची छायांकित प्रत, अतिक्रमणधारकांवर सदर ग्रामपंचायत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, किती अतिक्रमण कायम करण्यात आले, त्याबाबत गाव नमुना नं.८, अतिक्रमण कायम करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी, अतिक्रमण कायम करण्याबाबत घेण्यात आलेल्या ठरावाची छायांकित प्रत, सन २०१९-२० ते २०२२-२३, |
| ४१ | १९.०६.२०२३ | ग्रामपंचायत अंतर्गत आस्थापनेवार कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी यांच्या सेवाकार्यकाळात शिवारात गट क्रमांकनिहाय किती प्लॉटींग लेआऊट करण्याकरिता नाहरकत देण्यात आले, सदर गटक्रमांक निहाय अकृषिक परवानाची छायांकित प्रत, नगर रचना कार्यालयाचे रेखांकन, सदर नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरिता घेण्यात आलेल्या ठरावाची छायांकित प्रत, आदी स्वरुपाची माहिती देण्यात यावी, सन २०१९-२० ते २०२२-२३, |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे विस्तृत व मोघम स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिसाद दिल्याबाबतचे कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही. माहिती अर्जानुसार मागणी केलेंली माहिती मिळाली नसल्यामुळे व सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कुठल्याही प्रकारची माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या या माहिती अर्जामध्ये त्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केलेले आहे. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.२०१६/प्र.क्र.(१७८/१६)सहा, दि.०१.०२.२०१७ मध्ये असे नमूद केलेले आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जास्त पृष्ठांची असल्यास त्यांना अवलोकन देऊन ५० पृष्ठांची माहिती विनामूल्य द्यावी व यापेक्षा जास्त माहिती हवी असल्यास त्यासाठी नियमित दराने आकारणी करण्यात यावी.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, लाडसावंगी, ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद सर्व जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली

व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ व महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (दुसरी सुधारणा) २०१२ नुसार माहितीचे अवलोकन हे अपिलार्थीस व्यक्तिशः अनुज्ञेय राहील व असे अवलोकन प्रतिनिधीस अनुज्ञेय असणार नाही.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह आठ व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.६२८१ ते ६२८८/२०२३/एस/ 19125 दिनांक : 18/10/2024

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६२८९/२०२३**

सौ.गिताबाई दिलीप म्हस्के,
रा.सुभेदार रामजीनगर, मिसारवाडी, पो.नारेगाव,
ता.जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
घनकचरा व्यवस्थापक,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त-५,
घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२८.०९.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ४२ | १२.०६.२०२३ | सन २०१९-२० ते २०२२-२३, सदरील कालावधीत वर्षनिहाय आपल्या मनपा कार्यालयात वार्डनिहाय साफसुफाई मंजुर कामाकरिता नियुक्त केलेल्या बचत गटाचे नाव, बचत गटामार्फत पुरविण्यात येणारी वार्डनिहाय साईटवरील कामगारांची एकुण संख्या, एकूण बचत गटात नियुक्त करण्याबाबत झालेला करार, त्यांना आतापर्यंत अदा केलेले देयके, सद्यस्थितीत चालु वार्डनिहाय बचत गटाचे नावे, त्यांच्यामार्फत नियुक्त एकुण साफसफाई मंजुर संख्या, देण्यात येणारे वेतन श्रेणी, मनपामध्ये आज रोजी किती एकुण बचत गट नियुक्त आहेत, त्याचे नाव, त्यांच्यामार्फत पुरविलेली कामगार संख्या, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे दि.०३.१०.२०२४ रोजीचे लेखी म्हणणे आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केलेले आहे की, अपिलार्थी यांनी

माहिती अधिकारातंर्गत माहितीची मागणी केला असता त्यांना दि.१९.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती कळविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कुठल्याही प्रकारची माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये त्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केलेले आहे. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.२०१६/प्र.क्र.(१७८/१६)सहा, दि.०१.०२.२०१७ मध्ये असे नमूद केलेले आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जास्त पृष्ठांची असल्यास त्यांना अवलोकन देऊन ५० पृष्ठांची माहिती विनामूल्य द्यावी व यापेक्षा जास्त माहिती हवी असल्यास त्यासाठी नियमित दराने आकारणी करण्यात यावी.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा घनकचरा व्यवस्थापक, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ व महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (दुसरी सुधारणा) २०१२ नुसार माहितीचे अवलोकन अपिलार्थी यांना व्यक्तिशः अनुज्ञेय राहील व असे अवलोकन प्रतिनिधीस अनुज्ञेय असणार नाही.

२. उपआयुक्त-५, घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ.६२८९/२०२३/एस/ 1912 5 दिनांक : 18/10/2024

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६२७२ ते ६२७५ व ६२९४/२०२३ (०५)**

सौ.गिताबाई दिलीप म्हस्के,
रा.सुभेदार रामजीनगर, मिसारवाडी, पो.नारेगाव,
ता.जि.छत्रपती संभाजीनगर

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, बाजार वाहेगाव, ता.जि.छत्रपती संभाजीनगर

उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, छत्रपती संभाजीनगर

उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२८.०९.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये प्रस्तुत द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणीच्यावेळी आयोगासमोर उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या पाच माहिती अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बाजार वाहेगाव, ता.जि.छत्रपती संभाजीनगर असे नमूद करुन माहितीची मागणी केली असल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी उपस्थित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेविका, श्रीमती क्षीरसागर आर.एस. यांनी असे अवगत केले की, आज रोजी अपिलार्थी यांची पंचायत समिती, छत्रपती संभाजीनगर अधिनस्त ग्रामपंचायत कार्यालयाशी संबंधित एकुण ४१ व्दितीय अपिलाची प्रकरणे सुनावणीकरिता प्रस्तावित आहे. सदर ४१ व्दितीय अपिलांपैकी बोर्ड क्र.२४ ते २८ मधील माहितीचे अर्ज हे ग्रामपंचायत, बाजार वाहेगाव या कार्यालयाशी संबंधित आहेत. सदर बाजार वाहेगाव ही ग्रामपंचायत जालना जिल्ह्यातील पंचायत समिती बदनापूर या कार्यालयाच्या अधिनस्त आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पंचायत समिती छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाच्या अधिनस्त वाहेगाव (देमणी) ही ग्रामपंचायत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात प्राधिकरणाचे नाव व पत्ता चुकीचा नमूद केला असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील अपिलार्थी यांचे पाचही माहितीचे अर्ज जालना जिल्ह्यातील बाजार वाहेगाव, ता.बदनापूर या ग्रामपंचायत कार्यालयास व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वाहेगाव (देमणी), ता.छत्रपती संभाजीनगर या ग्रामपंचायत कार्यालयास प्राप्त होऊ शकत नाहीत. आज रोजीच्या सुनावणीबाबत छत्रपती संभाजीनगर पंचायत समितीकडुन अवगत करण्यात आले असल्यामुळे वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रा.पं., वाहेगाव (देमणी) या नात्याने उपस्थित असुन सदर ग्रामपंचायत कार्यालयाचा पदभार नुकताच स्विकारलेला आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी अपिलार्थी यांचे माहिती अर्ज अप्राप्त असल्याचे व बाजार वाहेगाव ही ग्रामपंचायत जालना जिल्ह्यातील बदनापूर पंचायत समिती कार्यालयाच्या अधिनस्त असल्याचे अवगत केलेले आहे. अपिलार्थी यांना वाहेगाव (देमणी) या ग्रामपंचायत कार्यालयाशी संबंधित हवी असल्यास त्यांनी तसे सुधारित माहितीचे अर्ज सादर केल्यास त्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना नियमाप्रमाणे देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कुठल्याही प्रकारची माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बाजार वाहेगाव, ता.जि.छत्रपती संभाजीनगर असे नमूद करुन माहितीची मागणी केलेली आहे. तथापि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये बाजार वाहेगाव अशी ग्रामपंचायत अस्तित्वात नसल्याचे व बाजार वाहेगाव अशी ग्रामपंचायत जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यामध्ये अस्तित्वात असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अवगत केलेले आहे. अपिलार्थी यांनी त्यांना हवी असलेल्या माहितीबाबत प्राधिकरणाचा पत्ता योग्य नमूद केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थी यांचे माहितीचे अर्ज संबंधित ग्रामपंचायत कार्यालयास अप्राप्त असल्याचे दिसुन येत आहे. अत: अपिलार्थी यांना माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी प्राधिकरणाचा अचुक पत्ता नमूद करुन माहितीची मागणी करणे उचित ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

अपिलार्थी यांची उपरोक्त पाच द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ. ६२७२ ते ६२७५ व ६२९४/२०२३/एस/ 19126    दिनांक : 18 | 10 | 2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १९३८/२०२४**

श्री.बालाजी दशरथ देशमुख,
रा.गुगळ पिंपरी, पो.माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, वलाना, ता.सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१३.०३.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ११६ | २३.१०.२०२३ | आपल्या ग्रा.पं. कार्यालयातंर्गत १५ वित्त आयोग अंतर्गत झालेल्या सर्व कामाचे वर्क ऑर्डर, इस्टीमेट, मोजमाप पुस्तिका, संचिका व बिलाच्या व्हावचरच्या प्रती व कम्प्लीशन सर्टिफिकेट, कामाचे फोटो, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी कार्यालयाकडे वारंवार माहिती अर्ज सादर करतात. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे विस्तृत व व्यापक स्वरुपाच्या माहितीची मागणी केलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन हवी असलेली माहिती कार्यालयात उपस्थित राहुन प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थी यांना अवगत केलेले आहे. तथापि माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलार्थी कार्यालयात उपस्थित राहिले नसल्यामुळे माहिती अपिलार्थी यांना देता आलेली नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी कार्यालयात उपस्थित राहुन माहिती घेऊन जावी असे कळवितात. परंतु त्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहिल्यानंतर ते खोट्या केसेस करुन गुन्हा दाखल करतात. त्यामुळे माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहता आलेले नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती

उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केलेले आहे. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.२०१६/प्र.क्र.(१७८/१६)सहा, दि.०१.०२.२०१७ मध्ये असे नमूद केलेले आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जास्त पृष्ठांची असल्यास त्यांना अवलोकन देऊन ५० पृष्ठांची माहिती विनामूल्य द्यावी व यापेक्षा जास्त माहिती हवी असल्यास त्यासाठी नियमित दराने आकारणी करण्यात यावी.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वलाना, ता.सेनगाव, जि.हिंगोली यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७-(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ व महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (दुसरी सुधारणा) २०१२ नुसार माहितीचे अवलोकन अपिलार्थी यांना व्यक्तिशः अनुज्ञेय राहील व असे अवलोकन प्रतिनिधीस अनुज्ञेय असणार नाही.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.१९३८/२०२४/एस/ ~~1813~~ 1913 दिनांक : 18 | 10 | 2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ७७१६, ७७१७, ८२७८ व ८२८७/२०२४**

श्री.बालाजी दशरथ देशमुख,
रा.गुगळ पिंपरी, पो.माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
जिल्हा होमगार्ड कार्यालय, जुने पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा समादेशक,
जिल्हा होमगार्ड कार्यालय, जुने पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२४.०७.२०२४ (०२) व २९.०८.२०२४ (०२) रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये चार द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या चार माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ११७ | २६.०२.२०२४ | आपल्या कार्यालयाकडुन सन २०२१ ते आजपर्यंत सर्व झालेल्या पदोन्नती कर्मचारी होमगार्ड यांची संपूर्ण माहिती देणे, पदोन्नती सिनरिटीनुसार दिली किंवा अन्य कारण सर्व तपशिल देणे, |
| ११८ | ०५.०३.२०२४ | आपल्या विभागातील पर्यवेक्षक म्हणून होमगार्ड व अधिकारी यांना ऑफलाईन पध्दतीने बंदोबस्त कर्तव्य यावर घेतल्याले आदेशाच्या साक्षांकित प्रती देणे, त्यांचे बँक खातेवर मानधन जमा झाल्याच्या याद्या देणे, |
| १२० | ०५.०३.२०२४ | हिंगोली जिल्ह्यातील दि.०१.०१.२०२२ ते आजपर्यंत कार्यरत असलेल्या सर्व होमगार्डचे बदोबस्त कर्तव्य केल्याचे पोलीस स्टेशन ऑफलाईन / ऑनलाईन कर्तव्य प्रमाणपत्र साक्षांकित प्रतीत देणे, पदावरुन कमी केलेल्या होमगार्डचे नाव, कमी करण्याचे कारण व दिलेल्या आदेशाच्या साक्षांकित प्रती देणे, त्यांच्या मानधन जमा झालेल्या सर्व ऑनलाईन व ऑफलाईन साक्षांकित प्रतीत याद्या देणे, आज रोजी पदावर असलेल्या सर्व होमगार्डची नाव, स.क्र.पथक निहाय सर्व जिल्ह्यातील माहिती देणे, |
| १२१ | ०६.०२.२०२४ | आपल्या विभागाकडुन सन २०२१ ते आजपर्यंत होमगार्ड कर्तव्य कसुरी बाबत दिलेल्या सर्व साक्षांकित प्रती देणे, होमगार्ड यांनी दिलेल्या खुलासाबाबत दिलेल्या खुलाशाच्या साक्षांकित प्रती देणे, खुलासा दिल्यानंतर केलेल्या कार्यवाहीबाबत सर्व तपशिल सत्यप्रतीत देणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. सदर होमगार्ड विभागात होमगार्ड म्हणून कार्यरत असल्यामुळे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, उपलब्ध कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२२.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, कार्यालयाच्या आस्थापनेवर एकुण ११ पदे मंजुर असुन त्यापैकी प्रशिक्षण विभागातील एक व प्रशासन विभागातील एक असे दोनच पदे कार्यरत असुन सन २०२३-२०२४ मधील मार्च महिना अखेर होमगार्डची देयके व अत्यावश्यक कामकाज चालु असल्याने तसेच लोकसभा निवडणूक प्राधान्य कामकाज चालु असल्याने मनुष्यबळा अभावी मागितलेली माहितीच्या अधिकारातील माहिती कलम ७ (९) नुसार नाकारण्यात येत आहे, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची असुन बहुतांश माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. अपिलार्थी यांनी मोघमपणे संपूर्ण जिल्ह्याशी संबंधित माहिती मागितलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जिल्हा होमगार्ड कार्यालय, हिंगोली यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली केवळ **अपिलार्थी यांचेशी संबंधित माहित्ती** (उर्वरित सर्व माहिती वगळून), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ व महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (दुसरी सुधारणा) २०१२ नुसार माहितीचे अवलोकन अपिलार्थी यांना व्यक्तिशः अनुज्ञेय राहील व असे अवलोकन प्रतिनिधीस अनुज्ञेय असणार नाही.

२. जिल्हा समादेशक, जिल्हा होमगार्ड कार्यालय, हिंगोली यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह चार व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.७७१६, ७७१७, ८२७८ व ८३८७/२०२४/एस/ ~~18129~~ 19129 दिनांक : 18/10/2024

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ७७१८/२०२४**

श्री.बालाजी दशरथ देशमुख, — अपिलार्थी
रा.गुगळ पिंपरी, पो.माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, सेनगाव, जि.हिंगोली

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, हिंगोली ग्रामीण, हिंगोली

**(ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२४.०७.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ११९ | २४.०१.२०२४ | आपल्या पो.स्टे. सेनगाव अंतर्गत पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे यांच्या कार्यकाळातील स्टे.डा.च्या सर्व नोंदी देणे, शासनाकडुन गुन्हा तपास कामी मिळालेल्या सर्व निधीचा तपशिल, गाडी नं. मालकांचे नाव, स्टे.डा.क्र., टोलची पावती, व्हावचरसह तपशिल देणे, वाहन डायल ११२ च्या सर्व नोंदी, डायल ११२ अन्य आवश्यक सेवा सोडुन इतर कामासाठी गाडी वापरलेले वरिष्ठ अधिका-याचे आदेश, क्र. आदेशाची सत्यप्रत देणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अनेक विषयाशी संबंधित आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी ही बाब विचारात घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील फेटाळलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती

दिली नसल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एका पेक्षा अधिक विषयाशी संबंधित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जातील पहिल्या विषयाची म्हणजे स्टेशन डायरीची माहिती देय होईल. परंतु सदर स्टेशन डायरीची माहिती ही गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे व ही माहिती अपिलार्थी यांच्याशी निगडित नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही. म्हणुन अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जातील विषय क्र.२ ची माहिती म्हणजे शासनाकडुन गुन्हा तपास कामी मिळालेल्या सर्व निधीचा तपशिल देय होईल. सबब, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर पारित केलेल्या निर्णयामध्ये अंशत: बदल करुन आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, सेनगाव, जि.हिंगोली यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती म्हणजे शासनाकडुन गुन्हा तपास कामी मिळालेल्या सर्व निधीचा तपशिल (केवळ श्री.रणजीत भोईटे, पोलीस निरीक्षक यांच्या कार्यकाळातील), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, हिंगोली ग्रामीण, हिंगोली यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.७७१८/२०२४/एस/- 19130 दिनांक :- 18/10/2024

सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७७१३/२०२४

श्री.बालाजी दशरथ देशमुख,
रा.गुगळ पिंपरी, पो.माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

(ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२४.०७.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १२२ | २४.०१.२०२४ | पाणी पुरवठा विभाग हिंगोली आपल्या विभागातंर्गत माझोड, कहाकर, मलास पिंपरी, वलाना, कडोळी, गारखेडा, भगवती जलजीवन मिशन अंतर्गत या गावामध्ये कार्यारंभ आदेश प्रती देणे, वर्क ऑर्डर, इस्टीमेट, कामाबद्दल दिलेले ग्रा.पं. चे ठराव, व्हावचर, एमबी च्या साक्षांकित प्रती, संचिका, जीएसटी बिलाच्या सर्व सत्यप्रती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोर्ट कामासाठी, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागणार आहे. ही बाब कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, हिंगोली यांनी

अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद केवळ एका गावाची माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. सदर अवलोकनाच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांना नेमक्या कोणत्या एका गावाची माहिती हवी आहे याबाबत जन माहिती अधिकारी यांना अवगत करावे. त्यानुसार अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ व महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (दुसरी सुधारणा) २०१२ नुसार माहितीचे अवलोकन अपिलार्थी यांना व्यक्तिशः अनुज्ञेय राहील व असे अवलोकन प्रतिनिधीस अनुज्ञेय असणार नाही.

२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.७७१३/२०२४/एस/ ~~1828~~ 1928 दिनांक : 18/10/2024

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ७७१४ व ७७१९/२०२४ (०२)**

श्री.बालाजी दशरथ देशमुख,
रा.गुगळ पिंपरी, पो.माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
शिक्षण विभाग माध्यमिक, जिल्हा परिषद, हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२४.०७.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद- सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १२३ | २४.०१.२०२४ | शिक्षण विभाग जि.प.हिंगोली स्वामी समर्थ विद्यालय हिंगोली व स्वामी समर्थ विद्यालय सिंदगी खांबा या दोन्ही विद्यालयाला नुतनीकरण दि मान्यता शाळेचे ठिकाणाचा ७/१२ किंवा नमुना नं.८, सर्व शिक्षकांच्या २००५ ते आजपर्यंतच्या वैयक्तिक मान्यता, विद्यार्थ्याचे आधार नंबर व पत्ता असलेली संपूर्ण माहिती देणे, शाळा हस्तांतर झाली असेल तर त्या बाबत लागणाऱ्या सर्व शिक्षण अधिकारी यांनी घेतलेल्या कागदपत्राच्या सत्य व साक्षांकित प्रती देणे, |
| १२५ | २४.०१.२०२४ | शिक्षण विभाग जि.प.हिंगोली स्वामी समर्थ विद्यालय हिंगोली व स्वामी समर्थ विद्यालय सिंदगी खांबा या दोन्ही विद्यालयाला नुतनीकरण दि मान्यता शाळेचे ठिकाणाचा ७/१२ किंवा नमुना नं.८, सर्व शिक्षकांच्या २००५ ते आजपर्यंतच्या वैयक्तिक मान्यता, विद्यार्थ्याचे आधार नंबर व पत्ता असलेली संपूर्ण माहिती देणे, शाळा हस्तांतर झाली असेल तर त्या बाबत लागणाऱ्या सर्व शिक्षण अधिकारी यांनी घेतलेल्या कागदपत्राच्या सत्य व साक्षांकित प्रती देणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची असुन ती एका पेक्षा अधिक विषयाशी संबंधित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती

अनुज्ञेय आहे. अपिलार्थी यांच्या वर नमूद दोनही माहिती अर्जातील माहिती एक सारखीच असल्याचे दिसुन येत आहे.
सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग माध्यमिक, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ व महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (दुसरी सुधारणा) २०१२ नुसार माहितीचे अवलोकन अपिलार्थी यांना व्यक्तिशः अनुज्ञेय राहील व असे अवलोकन प्रतिनिधीस अनुज्ञेय असणार नाही.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ.७७१४ व ७७१९/२०२४/एस/ 19123 दिनांक : 18 | 10 | 2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७७१५/२०२४**

श्री.बालाजी दशरथ देशमुख,
रा.गुगळ पिंपरी, पो.माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली — उत्तरवादी क्र.२

**(ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२४.०७.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १२४ | २४.०१.२०२४ | आपल्या विभागाकडुन आयपीएम सुनिल भिमराव मुलेश्वर यांचा कंत्राट जॉईनिंग दिनांक, जॉईनिंग पासुन आजपर्यंत केलेल्या सर्व ड्युटीचा तपशिल, हजेरी पट देणे, त्यांच्या कर्तव्य दरम्यान त्यांना दिलेल्या मानधनाचा तपशिल देणे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. एकाच कर्मचाऱ्याने दोन ठिकाणी काम करुन मानधन घेतलेले आहे. नियमानुसार एक कर्मचारी दोन ठिकाणी काम करु शकत नाही. या सर्व बाबींची शहानिशा करण्याकरिता मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्राप्त माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती व वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांना अवगत करण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्राप्त प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोर्ट कामासाठी, असे

कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ व महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (दुसरी सुधारणा) २०१२ नुसार माहितीचे अवलोकन अपिलार्थी यांना व्यक्तिशः अनुज्ञेय राहील व असे अवलोकन प्रतिनिधीस अनुज्ञेय असणार नाही.
२. जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ.७७१५/२०२४/एस/- 1912 दिनांक : 18/10/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ४४८३ ते ४४८५/२०२३ (०३)**

श्री.बालाजी दशरथ देशमुख,
रा.गुगळ पिंपरी, पो.माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय अधीक्षक,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१०.०७.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १२६ | ०७.०२.२०२३ | आपल्या जिल्हा परिषद कार्यालयाकडुन जिल्हा परिषद सर्कल, आजेगाव, बाभुळगाव, सवना, गोरेगाव या सर्कलमध्ये विविध विकास कामे करण्यासाठी जिल्हा परिषद सदस्य यांना वरील ४ सर्कल मध्ये किती निधी दिला, कोणत्या विकास कामासाठी किती निधी दिला व तो निधी कोणत्या कामासाठी वापरण्यात आला याची वरील सर्कलमधील सर्व सत्य व साक्षांकित प्रतीत माहिती मिळणे, |
| १२७ | ०७.०२.२०२३ | सवना, गोरेगाव, बाभुळगांव, आजेगाव या सर्कलमध्ये जिल्हा परिषद सदस्य यांनी दलीत वस्ती सुधार योजना बांधकाम विभाग तसेच महिला बालकल्याण विभाग, तसेच कृषि विभाग तसेच शेष निधी, तीर्थक्षेत्र विकास निधी, जिल्हा नियोजन, तसेच जनसुविधा व इतर सर्व योजनेमधुन केलेल्या सर्व कामाचे वर्क ऑर्डर अंदाजपत्रकाच्या व मोजमाप पुस्तिकेच्या साक्षांकित प्रतीत माहिती मिळणे, |
| १२८ | ०७.०२.२०२३ | सवना, गोरेगाव, बाभुळगाव, आजेगाव या सर्कलमध्ये जिल्हा परिषद सदस्य यांचे विकास कामे करणे संदर्भात आलेल्या सर्व निधीचा तपशिल तसेच केलेल्या विकास कामाचे नाव, त्या कामाचे वर्कऑर्डर, अंदाजपत्रक, केलेल्या कामाच्या साहित्य सामुग्री खरेदी केलेल्या बिलाच्या साक्षांकित प्रतीत माहिती मिळणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी

यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतेही उत्तर मिळाले नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केलेले आहे. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.२०१६/प्र.क्र.(१७८/१६)सहा, दि.०१.०२.२०१७ मध्ये असे नमूद केलेले आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जास्त पृष्ठांची असल्यास त्यांना अवलोकन देऊन ५० पृष्ठांची माहिती विनामूल्य द्यावी व यापेक्षा जास्त माहिती हवी असल्यास त्यासाठी नियमित दराने आकारणी करण्यात यावी.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद तीनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास, उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ व महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (दुसरी सुधारणा) २०१२ नुसार माहितीचे अवलोकन अपिलार्थी यांना व्यक्तिशः अनुज्ञेय राहील व असे अवलोकन प्रतिनिधीस अनुज्ञेय असणार नाही.

२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, हिंगोली यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.४४८३ ते ४४८५/२०२३/एस/ 1912 दिनांक :- 18/10/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८३६७ ते ८३६९/२०२३ (०३)**

श्री.बालाजी दशरथ देशमुख,
रा.गुगळ पिंपरी, पो.माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२८.१२.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १२९ | २२.०८.२०२३ | जवाहरलाल नेहरु मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह हिंगोली या वस्तीगृहाचे २००९ ते आजपर्यंत वर्गनिहाय जातनिहाय बोनाफाईड तसेच विद्यार्थ्यांचे आधारकार्ड सत्यप्रतीत देणे, शाळेतील हजेरीच्या सत्यप्रती देणे, |
| १३० | २२.०८.२०२३ | जवाहरलाल नेहरु मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह हिंगोली २००९ ते आजपर्यंत ६०% व ४०% कोणत्या नियमानुसार, संच मान्यता करुन उचलण्यात आलेल्या बिलाची सत्यप्रत, |
| १३१ | २२.०८.२०२३ | जवाहरलाल नेहरु मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह हिंगोली या वस्तीगृहात सचिव / अध्यक्ष स्वत:ची स्वतंत्र वस्तीगृह असताना सदर सचिव / अध्यक्ष वस्तीगृहात राहतात याबाबत शासन परिपत्रक देण्यात यावे, आतापर्यंत काढलेल्या सर्व बिलाच्या मुल्यांकन प्रमाणपत्राआधारे काढलेल्या सर्व भाडेपट्टयाचे दस्तावेज साक्षांकित प्रतीत देणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती वस्तीगृहाशी संबंधित असल्यामुळे माहिती अर्ज संबंधित वस्तीगृहाकडे वर्ग करण्यात आलेले आहेत. अपिलार्थी यांच्या प्राप्त प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती

मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोठ्या कालावधीची, विस्तृत व व्यापक स्वरुपाची व काही माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. अशी विस्तृत व व्यापक माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर सिव्हिल अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी दिलेल्या निर्णयाकडे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे. या सर्व बाबी विचारात घेता, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (घ) नुसार आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अपिलार्थी यांची विचाराधिन तीनही व्दितीय अपील फेटाळण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त तीन व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहेत.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ. ८३६७ ते ८३६९/२०२३/एस/ 1120 दिनांक : 18/10/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ८३७०, ८३७१ व ८३७३/२०२३ (०३)**

श्री.बालाजी दशरथ देशमुख,
रा.गुगळ पिंपरी, पो.माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

(ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.१०.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२८.१२.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १३२ | २३.१०.२०२३ | सेनगाव तहसिल कार्यक्षेत्रांमध्ये अवैध रेती गौण खनिज विनापरवांना वाहनावर केलेल्या कार्यवाहीचा सर्व तपशिल देणे तसेच इतर सर्व रेती स्टॉक जप्त केलेल्या व पंचनामा केलेल्या पंचनामा करुन पोलीस पाटील किंवा सरपंच, कोतवाल, तलाठी, मंडळ अधिकारी यांच्या स्वाधीन केल्याबाबत सर्व प्रती देणे तसेच जप्त केलेल्या रेतीची शासकीय नियमाप्रमाणे झालेल्या हराशीच्या साक्षांकित प्रती देणे, दि.०१.०१.२०१७ ते आजपर्यंत, |
| १३३ | २३.१०.२०२३ | सेनगाव तहसिल कार्यक्षेत्रांमध्ये एन.ए.ले आऊट झालेल्या प्लॉटसाठी व बांधकाम व रस्त्याच्या कामासाठी व इतर सर्व परवानगी संदर्भात अधिकृत घेतलेले कागदपत्र प्रती व इतर रस्त्याच्या सर्व कामांसाठी मुरुम गौनखनिज टाकण्यासाठी परवानगी दिलेल्या रॉयल्टी पावत्या तसेच गट क्र. परवानगीसाठी दिलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती देणे, सन ०१.०१.२०१८ ते आजपर्यंत, |
| १३४ | २३.१०.२०२३ | मौजे सेनगाव गट ९४४ मधील कयाधु नदीकाठावरील प्लॉटींग मधील कामासाठी मुरुम गौनखनिज टाकण्यासाठी परवानगी दिलेल्या रॉयल्टी पावत्या तसेच गट क्र. परवानगीसाठी दिलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती देणे, दि.०१.०१.२०२२ ते आजपर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोठ्या कालावधीची, विस्तृत व व्यापक स्वरुपाची व काही माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. अशी विस्तृत व व्यापक माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर सिव्हिल अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी दिलेल्या निर्णयाकडे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे. या सर्व बाबी विचारात घेता, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (घ) नुसार आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अपिलार्थी यांची विचाराधिन तीनही व्दितीय अपील फेटाळण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

उपरोक्त तीन व्दितीय अपीले फेटाळण्यात येत आहेत.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.८३७०, ८३७१ व ८३७३/२०२३/एस/ 19119 दिनांक :- 18/10/2024

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते